# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**द्रोणागिरीनोड (ता.उरण, जि.रायगड) सिडको प्रशासनामार्फत नविन रुग्णालय उभारण्याबाबत**

**(१) ४५ (१६-०३-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) द्रोणागिरीनोड (ता.उरण, जि.रायगड) येथे विविध विकासकामांच्या नावाखाली २८ गावांच्या जमिनी संपादीत करणा-या सिडको प्रशासनाने आरोग्य सेवेकडे दुर्लक्ष केल्यामुळे प्रकल्पग्रस्त व नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिकीकरण व लोकवस्तीने व्यापलेल्या उक्त विभागात सातत्याने होणारी वाहतुक कोंडी, अपघात व मोठ्या प्रमाणात होणा-या वायु प्रदुषणामुळे होणारे आजार यावर उपचार करण्यासाठी सुसज्ज असे एकही रुग्णालय नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रकल्पग्रस्त व नागरिकांच्या आरोग्य सेवेकडे दुर्लक्ष करणा-या संबंधीत विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त विभागात नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्यासाठी सुसज्ज असे रुग्णालय उभारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) द्रोणागिरी नोड व परिसरातील गावांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान योजनेंतर्गत २ आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी सिडकोकडुन आरोग्य विभागास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत, उरण येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय तसेच कोप्रोली येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे.

उरण येथील ३० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता प्राप्त झालेली असून सिडकोकडून जागा निश्चित करण्यात आली असून बांधकाम खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच जे.एन.पी.टी. मार्फत परिसरातील नागरिकांना त्यांचे रुग्णालयातील बाह्य रुग्ण व आंतररुग्ण सेवा तसेच खाजगी रुग्णालयामार्फत अपघात झालेल्या रुग्णांसाठी अपघात उपचार सुविधा उपलब्ध आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सालेकसा नगरपंचायती अंतर्गत (जि.गोंदिया) सिमेंट रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२) १४६ (१८-०३-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सालेकसा नगरपंचायती अंतर्गत (जि.गोंदिया) सिमेंट रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर, कामाच्या गुणवत्तेवर परिसरातील नागरीकांनी आक्षेप घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकुष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत नागरीकांनी तहसिलदार सालेकसा यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रभारी मुख्याधिकारी, कनिष्ठ अभियंता यांनी सदर प्रकरणी प्रतिसाद न दिल्याची नागरीकांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) • नगरपंचायत सालेकसा मधील नागरिकांनी, श्री. ब्रम्हानंद ब्राम्हणकर ते श्री. पारसनाथ थेर यांच्या घरापर्यंत रोड व नालीचे बंद असलेले काम सुरु करुन ते अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे व्हावे, अशा आशयाचे मुख्याधिकारी, नगरपंचायत सालेकसा यांच्याकडे निवेदन सादर केले होते.
• सदर निवेदन विचारात घेऊन, नगरपंचायतीचे अभियंता यांनी स्थळ पाहणी केली असता कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकानुसार काम होत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांनी संबंधीत कंत्राटदार यांना दिनांक २/१/२०२० रोजी नोटीस देऊन करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कामे करावे, असे कळविले.
• याबाबत संबंधीत कंत्राटदारानी सदर बाब मान्य करुन संबंधीत कामाची दुरुस्ती करण्याचे व अंदाजपत्रकाप्रमाणे कामे करण्याची दिनांक १७/१/२०२० रोजीच्या पत्रान्वये हमी दिली होती व त्यानुसार काम केले.

• कंत्राटदाराकडून झालेल्या कामाचे शासकीय तंत्रनिकेतन, साकोली यांच्याद्वारे त्रयस्त तांत्रिक लेखा परिक्षण करण्यात आले. त्यांच्या अहवालानुसार कामामध्ये काही त्रुटी आढळून आल्या असून त्या त्रुटींची पूर्तता कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घेण्यात आलेली आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील स्मार्ट पार्किंग योजनेंतर्गत महानगरपालिकेला निम्म्यापेक्षाही कमी हिस्सा मिळणार असल्याबाबत

**(३) २२० (०२-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहर येथील रामदास पेठेतील सेंट्रल बाजार रोडवर स्मार्ट पार्किंग योजना राबविण्यात येत असुन या स्मार्ट पार्किंगची देखभाल आदि तांत्रिक कामे स्मार्ट सिटी उपक्रमातुन केली जाणार असुन या अंतर्गत मिळणा-या उत्पन्नातुन नागपूर महानगरपालिकेला निम्म्यापेक्षाही कमी हिस्सा मिळणार असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने स्मार्ट ॲन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या सहकार्याने रामदासपेठेत क्रिम्स हॉस्पीटल ते काचीपुरा चौकापर्यंतच्या रस्त्यालगत ५०० मीटर लांबीची स्मार्ट पार्किंगची योजना तयार केली असुन एका वेळेस ८५ चार चाकी गाड्या राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची निविदा काढण्यात आली असुन या अनुषंगाने काढण्यात आलेल्या प्रस्तावानुसार ४६ टक्के वाटा नागपूर महानगरपालिकेला मिळणार असल्याचे नमूद केले असुन या प्रकपाच्या देखभालीचा व इतरही खर्च महानगरपालिका करणार आहे परंतू यातील उत्पन्नाचा हिस्सा संबंधित कंत्राटदाराला अधिक मिळणार आहे, त्यामुळे नागपूर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे लक्षात घेता याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) शहरातील रामदास पेठेत क्रिम्स हॉस्पीटल ते काचीपुरा चौकापर्यंत रस्त्यालगत ५०० मीटर लांब जागेत संपूर्ण स्वयंचलीत यंत्रणा उभारुन, ६९ चारचाकी वाहनाकरता स्मार्ट पार्किग व्यवस्था राबविण्यास महापालिकेने दिनांक २०/०६/२०१७ च्या ठरावान्वये मंजुरी दिलेली आहे.

सदरची योजना, महाराष्ट्र शासनाच्या महा आय.टी. विभागाकडून प्राप्त निधी अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या, स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरशन कडून, नागपूर शहराची वाहतुक व्यवस्था सुरळीत व्हावी यासाठी राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आयटी विभागाकडून नियुक्त एजन्सीमार्फत उपरोक्त जागेवर बसविण्यात आलेल्या ६९ पार्किंग सेन्सर, २पे-बुथ, २ टिकेट डिस्पेंशर, ४ बुम बॅरीयर, २ सर्वर ॲण्ड सिस्टम मशीन, २ डिस्प्ले बोर्ड, ४ जंक्शन बॉक्स, ६ सिसिटिव्ही कॅमेरे, ८ वायफाय पॉईन्ट, ५ केवीए बॅटरी इंक्लोझर, २ टिकेट प्रिंटर इ. कामावर शासन निधीतून आतापर्यंत रु.१०६ लक्ष इतका निधी खर्च झाला असून, या यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती ०५ वर्षाकरिता शासन नियुक्त एजन्सीमार्फत होणार असून, त्यानंतर पुढील १० वर्षासाठी कंत्राटदाराकडून करण्यात येणार आहे.

या पार्किंगच्या संचालनाकरिता ऑपरेटर नियुक्त करण्याच्या दृष्टीने महापालिकेने स्पर्धात्मक निविदेद्वारे प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. यातून निवडलेल्या महत्तम प्रस्तावास महापालिकेच्या स्थायी समितीने दिनांक २७/१२/२०१९ च्या ठरावान्वये मंजुरी दिलेली आहे. अद्याप सदरचा ठराव कार्यान्वित झालेला नाही.

महत्तम प्रस्तावानुसार, महानगरपालिकेच्या दिनांक २०/०६/२०१७ अन्वये मंजूर "स्मार्ट पार्कींगच्या दरानुसार" महापालिकेस पार्किंग शुल्कापोटी १५ वर्षात प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या ४६ टक्के वाटा प्राप्त होणार आहे. त्यामुळे याप्रकरणात महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही, याची पूर्ण दक्षता घेण्यात आल्याचे, महापालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

**बाळापुर (जि.अकोला) नगरपरिषदेत मानवी विष्ठेची वाहतूक मजुरांकडून होत असल्याबाबत**

**(४) ३८८ (०२-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापुर (जि.अकोला) नगरपरिषदेत मलनिस्सारण यंत्र उपलब्ध नसल्याने संबंधित अधिकारी मानवी विष्ठेची वाहतूक मजुराकडून करुन घेत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानवी विष्ठेची वाहतूक मानवाकडून करण्यास बंदी असल्याचे नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना माहित असूनही अशा प्रकाराचे कार्य मजुरांकडून केले जात असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई मुख्यधिकारी, बाळापूर यांनी केली आहे काय,

(३) असल्यास, आधुनिक यंत्राचा पुरवठा शासन स्तरावरून केला असतानाही त्याचा वापर न करणे ही अक्षम्य चूक आहे याची संबंधित नगरपरिषदेने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने गंभीर दखल घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०)** :(१) अशी बाब निदर्शनास आली नसल्याचे नगरपरिषद बाळापूर तसेच जिल्हाधिकारी, अकोला यांनी कळविले आहे.

(२), (३) व (४) • बाळापूर नगरपरिषदेला दिनांक ६/११/२०१८ रोजी ODF+ मानांकन प्राप्त झाल्यामुळे रुपये ४५ लाख इतकी प्रोत्साहनात्मक बक्षिसाची रक्कम प्राप्त झाली आहे.

• शासनाने स्वच्छ सर्वेक्षणामध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षिस रक्कमेच्या विनियोगाबाबत दिनांक २५/७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यपद्धती निश्चित केली असून बक्षिस पात्र नगरपरिषदांनी बक्षिसाच्या रक्कमेतून शहरासाठी सेफ्टीक टँक साफ करण्याकरीता Vacuum Emptier यंत्र खरेदी करण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. त्यानुसार नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया करुन नवीन यंत्र खरेदी केले आहे. त्याचा वापर दिनांक १५/७/२०२० पासून सुरु केला आहे.

• मजूरांकडून विष्ठा वाहतुकीची बाब निदर्शनास आली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांच्या प्रयोग शाळांमध्ये बोगस पदवी प्रमाणपत्र दाखवून भरती करण्यात आल्याबाबत

**(५) ५७७ (०२-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांच्या प्रयोग शाळांमध्ये, मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन डिप्लोमाचे बोगस पदवी प्रमाणपत्र दाखवून भरती करण्यात आलेल्या ७ तंत्रज्ञांवर वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल करुन दिनांक ३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास अटक केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रियेच्या वेळी १२३ अर्ज फेटाळले असताना व प्रमाणपत्र संशयास्पद असतानाही सदरहू ७ उमेदवारांना तंत्रज्ञ म्हणून कोणत्या आधारे सेवेत घेण्यात आले होते तसेच सदर प्रकरणातील उर्वरित ५ बोगस तंत्रज्ञांना अटक करणेबाबत शासन तथा पोलिसांकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासन तथा मुंबई महानगरपालिका प्रशासनाने गंभीर दखल घेऊन असे प्रकार यापुढे होऊ नये याकरिता उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांच्या प्रयोशाळांमध्ये मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन डिप्लोमाचे बोगस पदवी प्रमाणपत्र दाखवून भरती झालेल्या ७ तंत्रज्ञांवर वांद्रे पोलीस ठाणे येथे दिनांक १६.०४.२०१९ रोजी एफआयआर दाखल करण्यात आला असून, ६ तंत्रज्ञांना अटक करण्यात आली आहे.

सदर भरती प्रक्रियेवेळी १२३ अर्जदार अर्हताधारक नसल्यामुळे त्यांचे अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत फेटाळण्यात आले होते. तथापि, ७ अर्जदारांनी अर्ज करतेवेळी अर्हतेनुसार कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केली असल्यामुळे ऑनलाईन परीक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ता यादीनुसार त्यांना महापालिकेच्या सेवेत घेण्यात आले.

सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या ६ बोगस तंत्रज्ञांविरुध्द मा.महानगर दंडाधिकारी, वांद्रे (पूर्व) यांचे न्यायालयात पुरवणी दोषपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच एका बोगस तंत्रज्ञाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अटकपूर्व जामीन मिळणेकामी अर्ज सादर केला असून, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात सुनावणी सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) भविष्यात असे प्रकार होऊ नये याकरिता इच्छुक उमेदवारांकडून पदवी/पदविका प्रमाणपत्र संबंधित विद्यापीठाकडून वैध असल्याचे पत्र प्राप्त करुन घेण्यात येणार असल्याचे तसेच, इच्छुक उमेदवारांकडून सादर केलेल्या माहितीच्या सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरातील लोकमान्य टिळक रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग दोन महिने बंद राहणार असल्याबाबत**

**(६) ८४६ (०२-०४-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरातील गोरगरीब रुग्णांचा आधार असलेले मुंबईतील लोकमान्य टिळक रुग्णालयातील हृदयरोग शस्त्राक्रिया विभाग दिनांक १ जानेवारी, २०२० रोजीपासून बंद करण्यात आले असून पुढील किमान दोन महिने हा विभाग दुरुस्तीच्या कारणास्तव बंद राहणार असल्याचे रुग्णालय प्रशासनाने दिनांक ८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात धारावी, दादर, शिव, मांटुगा, वडाळा, चुनाभट्टी, कुर्ला अशा विविध ठिकाणांहून गरीब रुग्ण येत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन महिने सदर विभाग बंद राहणार असल्याने यावर रुग्णांनी नाराजी व्यक्त करुन आपत्कालीन परिस्थितीसह कठीण व गुंतागुंतीच्या हृदयरोग शस्त्राक्रियांसाठी हा विभाग लवकरात लवकर सुरु करावा अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीनूसार पूढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सायन रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभागातील २१ वर्षे जुन्या असलेल्या वातानुकूलित यंत्रणेमध्ये वारंवार बिघाड होत होता. त्यामुळे रुग्णांना जंतुसंसर्गाचा धोका होता. यास्तव सदर यंत्रणा बदलण्याकरिता सायन रुग्णालयातील हृदयरोग शस्त्रक्रिया विभाग काही कालावधीकरिता बंद ठेवण्यात आला होता. तथापि सदर कालावधीत ओपीडी पूर्णत: चालू ठेवण्यात आली होती.

सदर विभाग बंद असलेल्या काळात अत्यावश्यक शस्त्रक्रिया केईएम, नायर आणि जे.जे. हॉस्पिटल या रुग्णालयांत करण्यात आल्या. तसेच लहान मुलांवरील शस्त्रक्रिया कोकिलाबेन धीरुबाई रुग्णालय व एसआरसीसी नारायण रुग्णालयात करण्यात आल्या.

(४) लॉकडाऊनच्या कालावधीमुळे यंत्रणा बसविण्याच्या कामास मजूर उपलब्ध न झाल्यामुळे जास्त कालावधी लागला ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सदर शस्त्रक्रियागृहाचे काम पूर्ण झाले असून ते पूर्ण कार्यक्षमतेने सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुर्ला येथील तानसा जलवाहिनी शेजारील बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(७) ८६९ (०२-०४-२०२०). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कुर्ला एल विभागाच्या हद्दीमध्ये असलेल्या तानसा जलवाहिनी शेजारील १० मीटरच्या अंतरातील अनधिकृत बांधकामे हटविण्यापूर्वी त्यांचे पुनर्वसन करण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिलेले असतांनाही बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तानसा जलवाहिनी शेजारील बाधित कुटुंबांचे पुनर्वसन केल्याशिवाय बांधकामे निष्कासित करु नयेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी महानगरपालिकेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनधिकृत बांधकामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार बाधित झालेल्या कुटुंबियांचे पुनर्वसन करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) कुर्ला "एल" विभागाच्या हद्दीमधील तानसा मुख्य जलवाहिनीलगत असलेल्या १० मीटर अंतरातील साधारणत: ५,५०० बांधकामे बाधित होत असून, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, बांधकामांची पात्र/अपात्रता निश्चित केल्यानंतर अपात्र बांधकामांचे निष्कासन करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर बांधकामांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाहणी करुन मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ नुसार नोटीसा बजावण्यात येऊन पात्र बाधीत बांधकामधारकांचे पुनर्वसन उपलब्ध पीएपीनुसार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**मुंबईतील अंधेरी (प.), परळ, सायन येथे रुग्णनिगा उपकरणांच्या मागणीत वाढ झाली असल्याबाबत**

**(८) ९८९ (०३-०४-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्करोग, मधुमेह इत्यादी रोगाच्या उपचार आणि तपासणीसाठी तसेच रुग्णनिगा उपकरणांच्या मागणीत वाढ झाली असून या उपकरणांची प्रामुख्याने मागणी अंधेरी (प.), परळ, सायन मध्ये दिसून येत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोग, मधुमेह तसेच न्यूरोसर्जन यांना शस्त्रक्रियांमध्ये अधिक अचूकता प्रदान करणारी साधने आवश्यक आहेत आणि स्तनाच्या कर्करोगाच्या सुरक्षित आणि लवकर निदानासाठी पारंपरिक मॅमोग्राफीऐवजी वेदना रहित आणि रेडिएशन मुक्त पर्यायांची आवश्यकता असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) कर्करोग, मधुमेह इत्यादी रोगांच्या उपचार व तपासणीसाठी तसेच रुग्णनिगा उपकरणांच्या मागणीत वाढ झाली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) स्तनाच्या कर्करोगाच्या सुरक्षित आणि लवकर निदानासाठी जाहीर करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार मेमोग्राफी व सोनोमेमोग्राफी या पारंपारिक पध्दतीशिवाय कोणत्याही अन्य वेदनारहित व रेडिएशनमुक्त निदान चाचणीच्या पर्यायांचा वापर सध्या प्रस्थापित झालेला नाही.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, सायन आणि नायर रुग्णालय येथे मेमोग्राफी मशीन व सोनोमेमोग्रार्फी मशीन उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार सरोवराच्या (जि.बुलढाणा) काठावर असलेली शासकिय कार्यालये व निवासस्थाने वन विभागाच्या ताब्यात देण्याबाबत**

**(९) १३८७ (०३-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार सरोवराच्या (जि.बुलढाणा) काठावर पालिका व तहसिलदार कार्यालय, तहसिलदार व नायब तहसिलदार यांचे निवासस्थान, गुरांचा दवाखाना असून हा भाग इको सेंसिटिव्ह झोन असल्याने त्याचा वापर बंद करावा किंवा ते वन विभागाच्या ताब्यात देण्याचे आदेश नागपूर खंडपीठाने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालिकेने मागितलेल्या जागेचे रेडिरेकनर दरानुसार ८४ लाख ३५ हजार रुपये भरावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे. यासंदर्भात मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी दिनांक २३/८/२०१९ रोजी आदेश पारित केले आहेत.
(२) व (३) • मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तहसिलदार कार्यालय, नायब तहसिलदार यांचे निवासस्थान व पशुवैद्यकीय दवाखाना यांचा ताबा विभागीय वन अधिकारी, अकोला यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.
• मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लोणार नगरपालिका कार्यालय व मुख्याधिकारी, नगरपरिषद लोणार यांचे निवासस्थान यांचेकरीता लोणार येथील शासकीय जमीन सर्व्हे नंबर २२६ मधील १.७ हेक्टर आर. जागा प्रस्तावित केली असून सदर जागेचा तात्पूरता ताबा तहसिलदार, लोणार यांनी नगरपरिषदेकडे दिला आहे. तथापि, त्याकरीता बाजार मुल्याचे रुपये ८४,३५,०००/- इतकी रक्कम भरणा करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी नगरपरिषदेस कळविले आहे.
• नगरपरिषदेची आर्थिक स्थिती पाहता स्व:निधीतून सदर रक्कम देणे शक्य नसल्याने उपरोक्त जागा विनामुल्य उपलब्ध करुन देण्याबाबत अथवा जिल्हा वार्षिक योजनेतून जागेच्या मुल्यासाठी नगरपरिषदेस निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना दिनांक १/२/२०२० रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये कळविले आहे.
• दरम्यान शासनाने लोणार नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीकरीता रुपये ५ कोटी इतका निधी मंजूर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदुरा नगरपरिषदेला (जि.बुलढाणा) कायमस्वरूपी मुख्याधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(१०) १५२० (१६-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा नगरपरिषद (जि.बुलढाणा) येथे कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्याने शहरातील अनेक विकास कामे प्रलंबित असल्याची बाब दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याधिकारी अभावी शहरातील घरपट्टी, पाणीपट्टी व इतर करांची वसुली सुद्धा संथ गतीने सुरू असल्याने विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार कायमस्वरूपी मुख्याधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१), (२) व (३) • नांदुरा नगरपरिषदेच्या (जि.बुलढाणा) रीक्त मुख्याधिकारी पदाचा अतिरीक्त कार्यभार अन्य समकक्ष अधिका-यांकडे सोपविण्यात आला होता.
• त्यांचेमार्फत नगरपरिषदेचे प्रशासकीय कामकाज केले जात होते.
• तद्नंतर माहे ऑगस्ट, २०२० मध्ये सदर रीक्त पद भरण्यात आले असून, मुख्याधिकारी, नांदुरा नगरपरिषद या पदावर नियमित मुख्याधिका-याची नियुक्ती दि.११.०८.२०२० च्या आदेशानुसार करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे-सातारा महामार्गाच्या विस्तारीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(११) १७५० (१६-०३-२०२०). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-सातारा महामार्गाच्या देखभालीसाठी कोट्यवधी रुपये खर्च होत असले तरी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या महामार्गावर कच-याचे ढिग, दुभाजकात वाढलेली काटेरी झुडपे, दिशादर्शक फलकांचा व इतर सोयीसुविधांचा अभाव आहे तसेच सदर महामार्गाचे काम नऊ वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असून विस्तारीकरणाच्या कामात ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट, सदोष व अपूर्ण कामांमुळे होत असलेली वाहतूक कोंडी आणि अपघातजन्य परिस्थितीस अनुसरून रस्त्याच्या सध्य परिस्थितीचा अहवाल जिल्हाधिकारी, पुणे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राज्य शासनास पाठविला आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर रस्ता वाहतुकीस धोकादायक झालेला असल्यामुळे रस्त्यावरील रिलायन्स इन्फ्रा कंपनीचा टोलनाका बंद करण्याबाबतचा निर्णय घेण्याचे पत्र माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी पुणे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या सरव्यवस्थापकाना दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राधिकरणाच्या पुणे व्यवस्थापकांनी यापूर्वीही हा टोल नाका बंद करण्याबाबत निर्णय घेण्याची शिफारस वरिष्ठ कार्यालयाकडे केली होती, तसेच अद्यापही या रस्त्याचे काम

पूर्ण झाले नसल्याने परिणामी स्थानिक नागरिक व शेतकरी यांनी हा टोलनाका पुढे २० किमी अंतरावर पीएमआरडीए क्षेत्रात स्थलांतरित करावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रिलायन्स आणि एनएचआय यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार सन २०१० मध्ये सुरु झालेले रस्त्याचे काम माहे मार्च २०१३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु या रस्त्याच्या सहापदरीकरणाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसून रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असल्यामुळे सातत्याने अपघात होत असून आजवर अनेकांचे बळी गेले असतांना संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची आवश्यकता असतांनाही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून रिलायन्सला वेळोवेळी अभय देण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने शासनाकडून या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार संबंधित ठेकेदारावर व त्यास अभय देणा-या प्रशासनातील संबंधितांवर कारवाई करुन सदर टोल नाका बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१५-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्ग ४ रस्त्याच्या सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहे.

सदर महामार्गावरील काम प्रगतीपथावर असून महामार्गावरील कच-याचे ढीग उचलण्याबाबत व दुभाजकातील वाढलेला काटेरी झुडुपांचे ट्रिमिंग करणे वगैरे कामे संबंधित कंत्राटदारामार्फत नियमितपणे करुन घेण्यात येत आहेत. तसेच काही ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्यात आले आहेत, तथापी अन्य आवश्यक ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्याच्या सूचना कंत्राटदार यांना देण्यात आल्या आहेत.

दि.०४.०१.२०२० च्या पत्रानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी खेड शिवापूर टोल प्लाझा स्थलांतरणासाठी स्थानिकांनी पुकारलेल्या आंदोलनाबाबत आणि सदर कामाच्या संथ गतीबाबत तसेच डायव्हर्शनची देखभाल, सेवा रस्ते, अपघात प्रवण क्षेत्रांचे निर्मूलन करणे, खड्डे दुरुस्ती करणे, सर्व्हिस रोडची सुरक्षा, सुरक्षा सल्लागाराच्या शिफारशींचे पालन होणेबाबत वगैरे मुद्दे नमूद करुन सदर प्रकरणी उचित निर्णय घेण्याकरिता प्रादेशिक अधिकारी,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,मुंबई यांना कळविले .

(२) हे खरे नाही.

तथापी खेडशिवापूर टोल प्लाझा हटाव कृती समितीकडून सदर टोल नाक्याचे स्थलांतर पी.एम.आर.डी.ए. च्या हद्दीबाहेर करण्याकरिता प्राप्त झालेल्या निवेदनावर आधारित जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.१५.१२.२०१९ रोजी बैठक आयोजित करुन सदर बाबत दि.०४.०१.२०२० च्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाही/ उचित निर्णय घेण्याची विनंती प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, मुंबई यांचेकडे केली. तथापी सदर टोल प्लाझा

बंद करण्याबाबत निर्णय घेण्याची विनंती करण्यात आलेली नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(३) प्राधिकरणाच्या पुणे व्यवस्थापकांनी सदर टोलनाका बंद करण्याबाबतचा निर्णय घेण्याची शिफारस वरिष्ठ कार्यालयाकडे केलेली नाही. तथापि स्थानिक नागरिक, शेतकरी यांनी टोल नाका पुढे २० कि.मी. अंतरावर पीएमआरडीए क्षेत्राच्या हद्दीबाहेर स्थलांतरीत व्हावा अशी मागणी केली आहे, हे खरे आहे. परंतु करारनाम्याच्या अटी/शर्तींनुसार टोलनाक्याचे स्थलांतर शक्य नसल्याबाबत तसेच सदर मागणीच्या अनुषंगाने तेथिल स्थानिक लोकप्रतिनिधींशी दि.२२.०१.२०२० रोजी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(४) अंशत: खरे आहे.

पुणे-सातारा महामार्गाचा करार केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व मे.पी.एस.टी.आर.पी.एल. यांच्यामध्ये होऊन सदर काम दि.०१.१०.२०१० पासून सुरु आहे. परंतु सदर महामार्गाच्या कामास अ.क्र.५ च्या उत्तरात नमूद केलेल्या विविध कारणांमुळे विलंब झाला असून सद्यस्थितीत सदर काम पूर्णत्वाच्या दिशेने वेगाने सुरु असून दि.३१.०१.२०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच ऑक्टोंबर २०१९ पर्यंतच्या तीव्र व प्रदीर्घ पावसाळ्यामुळे महामार्ग व सेवारस्त्याची दुरवस्था झाली होती. परंतु ऑक्टोंबर २०१९ मध्ये कंत्राटदाराकडून बाह्यवळण व सर्व्हीस रोडसहीत रस्त्याच्या देखभाल व दुरुस्ती करण्यात आली.

परंतु देशातील लॉकडाऊनमुळे सध्या देखभाल दुरुस्ती तसेच मुख्य बांधकाम कामावर परिणाम झाला आहे. तथापि केंद्र राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २० एप्रिल,२०२० पासून हे काम पुन्हा सुरु झाले असून जानेवारी २०२१ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून रिलायन्सला अभय देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. शिवाय देखभाल दुरुस्ती ही निरंतर प्रक्रिया असून रस्ता वापरकर्त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी कंत्राटदारास कामे त्वरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,पुणे यांनी कळविले आहे.

(५) पुणे-सातारा रस्त्याच्या एकूण १४०.३५० कि.मी. लांबीपैकी सद्यस्थितीत १३४.८०० कि.मी. लांबीचे डीबीएम पूर्ण झाले असून सदर रस्त्यामधील एकूण ६२ स्ट्रक्चर्सपैकी एकूण ५३ स्ट्रक्चर्स पूर्ण झाली आहेत. उर्वरीत ९ स्ट्रक्चर्स पैकी ५ स्ट्रक्चर्सची कामेदेखील प्रगतीपथावर असून ४ स्ट्रक्चर्सचे काम स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे देखभाल दुरुस्तीच्या कालावधीमध्ये करण्यात येणार आहे.

तसेच सदर महामार्गाच्या कामास अ.क्र.५ च्या उत्तरात नमूद केलेल्या विविध कारणांमुळे विलंब झाला असून सद्यस्थितीत सदर काम पूर्णत्वाच्या दिशेने वेगाने सुरु असून दि.३१.०१.२०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच या रस्त्यावरील टोल नाका केंद्र शासनाच्या दि.२६.०८.२०१० च्या अधिसूचनेनुसार सुरु आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(६) सदरील कामास पुढील कारणांमुळे विलंब झाला असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

अ) स्थानिक ग्रामस्थांकडून त्यांच्या वेगवेगळ्या मागणीनुसार पुलाची उंची/ रुंदी व स्थान याबाबत वेळोवेळी रस्त्याच्या कामासाठी विरोध.

ब) वृक्ष प्राधिकरणाकडून रस्त्यावरील अडथळा ठरणारी झाडे तोडण्यासाठी/ स्थलांतरीत करण्यासाठी उशीरा मिळालेली मंजूरी.

क) वन विभागाकडून उशीरा आलेली मंजुरी.

ड) चौपदरीकरणापासून सहापदरीकरणा पर्यंत लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन करताना येत असलेल्या अडचणी.

ई) महामार्गाच्या रस्त्यांअंतर्गत येणाऱ्या विविध धार्मिक स्थळांच्या स्थलांतरणाबाबत ग्रामस्थांचा असलेला विरोध.

---

**अकोट नगरपालिकेमधील कंत्राटी घनकचरा व्यवस्थापन कर्मचा-यांवर होत असलेला अन्याय**

**(१२) १७७९ (०३-०४-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट नगरपालिकेमध्ये (जि.अकोला) कंत्राटी पध्दतीने शहरातील ओला व सुका कचरा उचलण्याचे काम पुणे येथील श्री स्वामी समर्थ सर्व्हीसेस कंपनीला दिला असून या कामाकरिता ५० कर्मचारी काम करित असून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द सदर कर्मचारी दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास पासून आमरण उपोषण करित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री स्वामी समर्थ सर्व्हीसेस कंपनीच्या कंत्राटदाराकडून घनकचरा व्यवस्थापन कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून घनकचरा व्यवस्थापन कर्मचा-यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) सदरच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्या कंत्राटदाराकडून पूर्ण होत नसल्याने दिनांक ३०/१२/२०१९ पासून आमरण उपोषण करणार असल्याचे दिनांक २४/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेस कळविले होते. परंतु यासंदर्भात नगरपालिका प्रशासनाकडून आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी आमरण उपोषण केलेले नाही.

(२) व (३) सदर कंत्राटी कामगारांच्या मागण्या कंत्राटदार श्री स्वामी सर्व्हीसेस, पुणे यांनी पूर्ण केल्या असून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे त्यामुळे समाधान झालेले आहे. त्यामुळे त्यांनी यासंदर्भातील पोलीस स्टेशन, अकोट येथे केलेली तक्रार देखील मागे घेतलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमीत करण्याबाबत**

**(१३) २१२२ (०३-०४-२०२०). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपालिका व महानगरपालिकामध्ये दिनांक ११ मार्च, १९९३ ते २३ मार्च, २००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचारी यांना नियमीत करण्यासंदर्भात माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासन निर्णय काढण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली व किती कर्मचारी यांना नियमीत करण्यात आले,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) राज्यातील विविध नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये सन दि.११ मार्च, १९९३ ते २३ मार्च, २००० या कालावधीत नियुक्त व कार्यरत रोंजदारी कर्मचा-यांच्या समावेशनाबाबत शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.१२२/नवि-१४, दि.०५.०२.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार समावेशन प्रक्रीयेसाठी विभागीय आयुक्त यांना प्राधीकृत करण्यात आले असून जिल्हाधिकारी यांना निवड प्राधीकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे. तसेच, नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत या प्रक्रीयेचे संनियंत्रण करण्यात येत आहे.अद्यापपर्यंत एकूण ४९५ कर्मचा-यांच्या समावेशनाची प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदुरा ते जळगाव जामोद (जि.बुलढाणा) रस्त्यावर उड्डाणपूलास मंजूरी मिळण्याबाबत**

**(१४) २२३८ (२०-०३-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा ते जळगाव जामोद (जि.बुलढाणा) या रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंगवर रेल्वेगाड्यांची ये-जा होत असल्याने गेट वारंवार बंद ठेवावे लागत असून चारचाकी व मोठ्या वाहनांना क्रॉसिंगकरिता गेटवर बराच वेळ उभे राहावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्या, सदर रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंग गेट जवळ वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याने सदर ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तदनुसार नांदुरा, जळगाव जामोद (जि.बुलढाणा) या रस्त्यावर रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१५-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्यातील रेल्वे उड्डाणपूल बांधकामांकरीता महाराष्ट्र शासन, भारतीय रेल्वे व केंद्रीय परिवहन मंत्रालय यांच्यामध्ये दि.१९.१२.२०१७ मध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार झालेला असून त्यानुसार महारेल-महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. (MRIDCL) ची स्थापना करण्यात आली आहे.

त्यानुसार महारेल यांनी दि.०८.०३.२०१९ च्या पत्रान्वये सदर सामंजस्य करारामध्ये प्रस्तुत रेल्वे उड्डाणपूलाच्या कामाचा समावेश असल्याचे कळविले. सद्यस्थितीत सदर कामाकरिता महारेल यांनी तयार केलेल्या सविस्तर प्रस्तावाबाबत काही मुद्यांच्या पूर्ततेसाठी दि.०५.०२.२०२० अन्वये महारेल यांना कळविण्यांत आले आहे. तथापी त्यांचेकडून प्राप्त झालेला रु.२०७.९८ कोटी रक्कमेचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते परिवहन व राजमार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांना दि.१८.०६.२०२० अन्वये सन २०२०-२१ च्या वार्षिक नियोजन आराखड्यात सामाविष्ट करण्याकरीता सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील मुंबादेवी मंदीर, सिध्दी विनायक मंदीर व महालक्ष्मी मंदीर येथील सोयीसुविधेबाबत

**(१५) २४४६ (१६-०३-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील मुंबादेवी मंदीर, सिध्दी विनायक मंदीर व महालक्ष्मी मंदीर ही मुंबईच्या जनतेची श्रध्दास्थाने असल्यामुळे देव दर्शनासाठी होणारी प्रचंड प्रमाणात गर्दी तसेच या परिसरात दर्शनासाठी येणा-या भाविकांची होणारी गैरसोय व कुचंबणा दूर व्हावी यासाठी आवश्यक असलेल्या सोयीसुविधा निर्मितीसाठी आराखडा तयार करुन त्यासाठी लागणारा आवश्यक तो निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनीधींनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१६-१०-२०२०) :** (१) मुंबई शहरातील सिध्दी विनायक मंदीर व महालक्ष्मी मंदीर येथील सोयीसुविधांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त झालेले नाही. श्री.मुंबादेवी मंदिर परिसराचा विकास व भाविकांसाठी मूलभूत सुविधा व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे “मुंबादेवी भव्य भक्त सेवा केंद्र” उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने रु. ५० कोटी मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून विनंती करण्यात आली आहे.

(२) मंदिर परिसराचा विकास व भाविकांसाठी मूलभूत सुविधा व अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे "मुंबादेवी भव्य भक्त सेवा केंद्र" उभारण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत या विभागाकडून कोणतीही योजना राबविली जात नसल्याने असा निधी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव (जि.यवतमाळ) शहरातील चौधरी ले-आऊट परिसरात नागरी सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(१६) २६६४ (०५-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव नगरपंचायत (जि.यवतमाळ) निर्मितीच्या काळापासून शहरातील चौधरी ले-आऊट परिसरात रस्ते, सांडपाण्याचे नाले, पथदिवे, कचराकुंडी व पाणीपुरवठा यासारख्या नागरी सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात वारंवार स्थानिकांनी संबंधित अधिका-यांकडे तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१), (२), (३) व (४) • महागाव नगरपंचायत अंतर्गत सर्व्हे नंबर ५७ मधील १.५९ हेक्टर आर. जागेवरील मंजूर ले-आऊट (चौधरी ले-आऊट) हा ग्रामपंचायतकालीन आहे.

• महागांव ग्रामपंचायतीची स्थापना सन २०१५ मध्ये झाली असून सद्य:स्थितीत नगरपंचायतीने सदर ले-आऊट मध्ये पिण्याच्या पाण्याचे पाईप लाईनचे काम, मुख्य रस्त्याचे काम पूर्ण केले आहे. आता अंतर्गत रस्त्याची कामे व नालीची कामे निविदा प्रक्रिया राबवून पूर्ण करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ढाणकी नगरपंचायत (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१७) २६७४ (०५-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढाणकी नगरपंचायत (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे मंजूर असलेली १८ कोटी रूपयांची मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०) :** (१) यासंदर्भात मा.विधानसभा सदस्य (उमरखेड-महागांव) यांनी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास दिनांक १९/१२/२०१९ रोजी सभागृहात औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी मागितल्याचे दिसते.

(२) • ढाणकी ग्रामपंचायतीचे दिनांक २/३/२०१९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे "ढाणकी नगरपंचायत" मध्ये रुपांतर करण्यात आले आहे.

• ढाणकी नगरपंचायत होण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना सादर केला होता. तथापि, ढाणकी नगरपंचायतीमध्ये रुपांतरीत झाल्याने नागरी भागाची योजना म्हणून शासनाच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून दिनांक २७/५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा परिषदेस कळविण्यात आले होते.

• वरील बाब विचारात घेऊन, मुख्याधिकारी, नगरपंचायत ढाणकी यांनी ढाणकी नगरपंचायतीकरीता सुधारित पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, पुसद यांना सादर केला.

• महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नगरपंचायत ढाणकीकरीता पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणाकरीता रुपये ३.८१ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याचे नगरपंचायतीस दिनांक २४/९/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

• यासंदर्भात पुढील कार्यवाही मुख्याधिकारी, नगरपंचायत ढाणकी यांच्याकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे व पिंपरी शहरातील झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत

**(१८) २८७६ (०६-०४-२०२०). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी शहरातील सुमारे ६०० झोपडपट्ट्यां असून प्रचलित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण नियमावली मध्ये सुधारणा प्रस्तावित करून सदर सुधारित नियमावली माहे जुलै,

२०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनास मान्यतेस्तव सादर केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नियमावलीस अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसून प्रस्तावित नियमावलीस मान्यता मिळणेबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, पात्र झोपडपट्टीधारकांना कालबद्ध नियोजन पद्धतीने सर्व सुविधांयुक्त मोफत घर देऊन त्यांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणत्या स्वरूपाची उपाययोजना तथा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (२०-१०-२०२०) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३) व (४) पात्र झोपडीधारकांना विहित वेळेत पुनर्वसन सदनिका उपलब्ध व्हावे यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांच्याकडून सुधारीत प्रारूप नियमावली (नियम ३-ब) प्राप्त झाली असून, सदर नियमावली शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे.

---

## सिडकोने पनवेल परिसरासोबत कळंबोली नोड हस्तांतरण करण्यापूर्वी हाती घेतलेल्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) ३७८३ (०५-०४-२०२०). श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडकोने पनवेल परिसरासोबत कळंबोली नोड हस्तांतरण करण्यापूर्वी आठ कोटी रुपयांची कामे हाती घेतली असून त्यात पावसाळी गटारांमधून माती काढण्याचाही समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गटारामधून काढलेली माती सिडकोच्या ठेकेदारांने उचलायला हवी होती मात्र ती पनवेल महानगरपालिकेच्या ठेकेदाराने उचलण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने यासंदर्भात तातडीने चौकशी करावी अशी मागणी एका राजकीय पक्षाच्या संघटनेने माहे जानेवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
कळंबोली नोडच्या सेक्टर १ ते २३ व सेक्टर १ ई व १६ ई मधील पायाभुत सुविधा जसे रस्ते, फुटपाथ, पावसाळी, गटारी, रस्ते दुभाजक, गटारांचे मॅनहोल इ. सुमारे ८.७५ कोटी रुपयांचे कामे सिडकोमार्फत सुरु असून प्रगतीपथावर आहेत.

सदर कामांतर्गत कालवे व गटारामधील साचलेली माती काढून त्याची विल्हेवाट लावण्याच्या कामाची किंमत सुमारे १.२३ कोटी रुपये असून सदरचे काम सिडकोच्या ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे.
(३) खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंदेवाही नगरपंचायत (जि.चंद्रपूर) अंतर्गत दिव्यांग व्यक्तींसाठी देण्यात येणाऱ्या निधीबाबत**

**(२०) ३८३४ (०५-०४-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे नगरपंचायत स्तरावर दिव्यांग व्यक्तींसाठी सन २०१८-१९ मध्ये शासनाकडून प्राप्त ५ टक्के दिव्यांग निधी त्यांच्या विकासाकरिता देण्यात आले आहे, परंतु कल्याणकारी योजना व अपंग स्वयंरोजगाराकरीता सदरील निधी दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ रोजीपर्यंत खर्च करण्याचे आदेश असतांनाही हा निधी खर्च करण्यात आला नसल्याची तक्रार अपंग विकास बहुउद्देशिय संस्थान देलनवाडी, तालुका कार्यालय सिंदेवाही यांनी संबधित अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०) :** (१) व (२) • यासंदर्भात अपंग विकास बहुउद्देशिय संस्थान, देलनवाडी यांनी नगरपंचायत सिंदेवाही यांच्याकडे तक्रार दाखल केली होती.
• नगरपंचायत सिंदेवाही यांनी सन २०१८-१९ चा ५% दिव्यांग निधी ९० दिव्यांग लाभार्थ्यांच्या खात्यात दिनांक २९/४/२०२० रोजी वर्ग केला आहे.
• नगरपंचायत सिंदेवाही यांनी सन २०१८-१९ चा दिव्यांग निधी सन २०२० मध्ये वितरीत केला असल्याने त्यांचेकडून दिनांक २०/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये विलंबाबाबतचा खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील ५% दिव्यांग निधी विहित कालावधीत खर्च करण्याची दक्षता घेण्याचे निर्देशदेखील देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुर्डूवाडी (जि.सोलापूर)व आजूबाजूच्या शहर वासियांना कृत्रिम पाणी टंचाई निर्माण होत असल्याबाबत**

**(२१) ४०३१ (०५-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असताना सुद्धा कुर्डूवाडी (जि.सोलापूर) व आजूबाजूच्या शहर वासियांना किरकोळ तांत्रिक कारण व पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्याचा हलगर्जीपणा मुळे दीड पटीने जास्त पाणी पट्टी भरून सुद्धा नागरिकांना दर ३ दिवसानंतर पाणी मिळत असुन कृत्रिम पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बार्शी-कुर्डूवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना सन १९८९ ला मंजूर होऊन सन १९९७ मध्ये पाणी वितरण सुरु झाले असून तांत्रिक बाबीमुळे शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाणी पुरवठा योजनेला २० वर्षे झाल्यामुळे कंदर ते कुर्डूवाडी दरम्यान पाईप लाईनला गळती लागल्यामुळे वा फुटल्यामुळे शेतात पाणी जाऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून परिणामी पाणी पुढे जात नसल्याने पाणी नियमित व पुरेश्या दाबाने येत नसुन पाणी टंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळुन
आले व तद्नुसार शासनाने हलगर्जीपणा करणा-या संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई व नादुरुस्त पाईपलाईन बदलून पाणी टंचाई दुर करणेसाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) नगरपरिषद कुर्डूवाडी व नगरपरिषद बार्शी यांच्या अहवालानुसार कुर्डूवाडी शहरास एक दिवसाआड व बार्शी शहरास दोन दिवसाआड पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करण्यात येतो, असे कळविले आहे.

(२) • सदरची योजना बार्शी-कुर्डूवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजना असून त्याची देखभाल दुरुस्ती बार्शी नगरपरिषदेकडून करण्यात येते. या योजनेनुसार कुर्डूवाडी शहर, मध्य रेल्वे व शहरालगतच्या भागांना तसेच बार्शी शहरास पाणी पुरवठा करण्यात येतो.

• सदर योजनेनुसार उपलब्ध होणाऱ्या पाण्यापैकी ३३% पाणी कुर्डूवाडी शहरास व उर्वरित पाणी बार्शी शहरास मिळते.

• कुर्डूवाडी आणि लगतचा भाग यांची लोकसंख्या विचारात घेता, ५.५ द.ल.लि. इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. तथापि, शहरास ३ द.ल.लि. इतका पाणी पुरवठा होत असल्याने शहर आणि लगतच्या भागास एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येतो.

(३) सदर पाणी पुरवठा योजनेची पाईपलाईन जुनी झाली असून वारंवार पाईपलाईन गळती होते. तथापि, नगरपरिषदेकडून तातडीने दुरुस्ती करुन पाणी पुरवठा पुर्ववत केला जातो, असे नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) • बार्शी शहरासाठी उजनी जलाशयामधून जलवाहिनी टाकण्याकरीता रुपये २८५ कोटीचा प्रस्ताव तयार करुन नगरपरिषदेने तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर केला आहे.

• कुर्डूवाडी शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी उजनी धरण यशवंत सागर जलाशय येथून स्वतंत्र पाईपलाईन व पंपिंग मशिनरी टाकण्याचा नगरपरिषदेने ठराव केला आहे व त्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगोला (जि.सोलापूर) शहरात वाढलेली अस्वच्छता

**(२२) ४४४६ (०५-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोला (जि.सोलापूर) शहरात खराब रस्त्यांमुळे, धुळीमुळे व वारंवार तुंबणाऱ्या गटारांमुळे व साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती प्रचंड प्रमाणात होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहने ये-जा करीत असतांना साचलेली धूळ हवेतील प्रदूषण वाढविण्यास कारणीभूत ठरत आहे, त्यामुळे शहरवासीयांना धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांडपाण्याचा निचरा होत नसलेल्या व दाट झुडपांच्या परिसरात डासांचे प्रमाण वाढत असल्याने डेंग्यूसदृश्य रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन संबंधीत दोषींवर कारवाई तसेच शहर स्वच्छ व निरोगी राखण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१), (२), (३) व (४) • जिल्हा प्रशासन अधिकारी, सोलापूर व मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोला यांनी कळविल्यानुसार, सांगोला शहरात रस्त्यावर गोळा होणारी धूळ दररोज सकाळी आणि संध्याकाळी रस्ते सफाई करुन कमी केली जाते व त्याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात येते.
• शहरातील तुंबणाऱ्या गटारी नियमितपणे स्वच्छ केल्या जात आहेत.
• पावसाळ्यामुळे खुल्या जागेवर साठणाऱ्या पाण्यामध्ये डास प्रतिबंधक उपाययोजना नियमित केली जाते.
• दाट झुडपांच्या परिसरात साठलेले सांडपाणी चारी काढून वाहते करण्यात येते. तसेच अनावश्यक काटेरी झाडे झुडपे काढण्यात आली आहेत.
• सदरच्या सांडपाण्यावर मलेरिया ऑईल, पावडर टाकणे इत्यादी प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगोला नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.
• नगरपरिषदेकडून ६ कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी पाण्याचे साठे तपासणी करुन अळी प्रतिबंधक "अबेट" या अळीनाशकाचा नियमित वापर करुन आजारावर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.

• नगरपरिषदेकडून घरोघरी डास प्रतिबंधक औषध व धूर फवारणी मशिनद्वारे नियमितपणे करुन डासांच्या प्रमाणावर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) नगरपालिकेतील दोन वाचनालये देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याबाबत

**(२३) ४४५८ (०५-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) नगरपालिकेने वाचनालयाची सुरुवात सन १९९० मध्ये केली असून दूरदर्शन केंद्र व हुतात्मा स्मारक या दोन्ही ठिकाणच्या जागेवरची वाचनालये देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याचे दिसून आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील २० वर्षापासून वाचनालये स्थलांतराच्या नावाखाली बंद करण्यात आले असून वाचकांची गैरसोय होत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपालिका प्रशासनाकडून वाचनालय पूर्ववत सुरु करण्यासाठी कोणतेही प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत विलंब करित असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून वाचनालय पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-१०-२०२०) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) • पंढरपूर शहरातील हुतात्मा स्मारक सुशोभिकरण व नुतनीकरण तसेच दूरदर्शन येथील इमारतीमध्ये दुरुस्तीचे काम करण्यात येत होते. त्यामुळे या दोन्ही ठिकाणचे वाचनालये काही कालावधीसाठी नगरपरिषदेकडून बंद करण्यात आली होती. आता सदरची दोन्ही वाचनालये चालू करण्यात आली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे उच्च न्यायालयाने चंद्रभागा वाळवंटात राहुट्या उभारण्यास बंदी घातल्याबाबत

**(२४) ४४६१ (०५-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे उच्च न्यायालयाने महाराज मंडळींना चंद्रभागा वाळवंटात राहुट्या उभारण्यास बंदी घातल्यानंतर भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रशासनाने ६५ एकर जागेची निर्मिती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या ठिकाणी पोलीस संकुल उभारण्याबाबत घोषणा करण्यात आली असून अद्याप काम झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपालिका प्रशासनाकडून ३ कर्मचारी नियुक्त केले असून सदर परिसर वगळता इतर कुठेही सुरक्षा नसल्याने तेथे दारुड्यांचे केंद्र तयार झाल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्या ठिकाणी २२ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासन उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती उपाययोजना करणार वा करीत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :**(१) हे खरे आहे.
(२) पंढरपूर नगरपरिषदेच्या मालकीच्या भूमापन क्रमांक १५५ मधील ७० आर. एवढे क्षेत्र पोलीस विश्रामाकरीता हस्तांतरीत करण्यास शासनाने दिनांक ११/२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे. तथापि, सदर क्षेत्र हे ब्लू लाईनमध्ये येत असल्याने तेथे बांधकाम करता येत नाही. त्यामुळे ६५ एकर परिसरातील इतरत्र ठिकाणची जागा निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर, पोलीस अधिक्षक, सोलापूर (ग्रामीण), उपविभागीय अधिकारी, पंढरपूर व मुख्याधिकारी, नगरपरिषद पंढरपूर यांनी स्थळ पाहणी केली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही पंढरपूर नगरपरिषदेकडून सुरु आहे.
(३) सदरच्या ६५ एकर जागेच्या ठिकाणी सुरक्षेसाठी व देखभालीसाठी ३ पाळीमध्ये एकूण ९ कर्मचारी नगरपरिषदेमार्फत नियुक्त करण्यात आले आहेत.
(४) व (५) • पोलीस निरिक्षक, पंढरपूर तालुका पोलीस ठाणे यांच्या अहवालानुसार ६५ एकर शेगाव दुमाला येथे दिनांक २२/१२/२०१९ रोजी २० वर्षीय युवकाचा मृतदेह आढळला. वैद्यकीय अधिकाऱ्याच्या अहवालानुसार मयतास फुप्फुसाचा आजार झाल्याने ते मयत झाले आहेत.
• ६५ एकर परिसरात सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलीस विभागामार्फत पोलीस पेट्रोलिंग केले जाते, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील विविध संवर्गातील कायम सेवकांचे वेतन थकित असल्याबाबत

**(२५) ४७७२ (०५-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील विविध संवर्गातील ३६३ कायम सेवकांचे माहे ऑक्टोबर, २०१७ पासून ते माहे जून, २०१८ अखेर तसेच माहे ऑगस्ट, २०१९ ते माहे नोव्हेंबर, २०१९ अखेर असे एकूण १३ महिन्यांचे वेतन थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायम सेवकांना इतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत महागाई भत्ताही योग्य प्रमाणात मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देण्यासह त्यांना योग्य प्रमाणात महागाई भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) • सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडील विविध संवर्गातील सरासरी ३६३ सेवकांचे माहे जुलै, २०१७ तसेच ऑक्टोबर, २०१७ ते माहे जून, २०१८ असे १० महिन्यांचे वेतन थकीत असून सदर थकीत वेतनाचे प्रकरण याचिका क्रमांक १६२५४/२०१८ अन्वये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
• तसेच सदर कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०१९ ते जानेवारी, २०२० पर्यंत ४ महिन्यांचे वेतन थकीत आहे.
• वरीलप्रमाणे सदर कर्मचाऱ्यांचे एकूण १४ महिन्याचे वेतन थकीत आहे.
(२) व (३) • परिवहन उपक्रमातील कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता परिवहन उपक्रमाने लागू केला आहे. त्यानुसार ८०% महागाई भत्ता देण्यात येत आहे. उर्वरित ६२% महागाई भत्ता उपक्रमाने लागू केलेला नाही. सदरचा महागाई भत्ता लागू करण्याची जबाबदारी परिवहन उपक्रमाची आहे. तथापि, बिकट आर्थिक स्थितीमुळे कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू करणे परिवहन उपक्रमास शक्य झालेले नाही, असे त्यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाकडील**
**बालवाडी शिक्षकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत**

**(२६) ४७७५ (०५-०४-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाकडील एकूण १८० बालवाडी शिक्षणसेविका केवळ ६५०० आणि ८००० हजार एवढ्या तुटपुंज्या मानधनावर सन १९८५ पासून कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी त्यांना मानधन वाढ, भविष्य निर्वाह निधी तसेच निवृत्ती वेतन इ. मागण्यांसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरवा करुनसुध्दा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन या बालवाडी शिक्षकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) • महानगरपालिका सोलापूरच्या वतीने १९८५ पासून बालवाडी शिक्षण दिले जाते. सन १९९७ पासून बालवाडी शिक्षणाच्या संनियंत्रणाचे काम प्राथमिक शिक्षण मंडळाकडे सोपविले गेले.

• सद्य:स्थितीत महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडे एकूण ८५ बालवाडी मंजूर आहेत. त्यामध्ये सध्या ७४ बालवाडी शिक्षिका व ६६ बालवाडी सेविका कार्यरत आहेत.

• महानगरपालिकेकडून जानेवारी, २०२० पासून बालवाडी शिक्षिकेस रुपये ७,२५०/- व सेविकेस रुपये ६,७५०/- दरमहा मानधन अदा केले जाते, असे प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी कळविले आहे.

• सदरच्या शिक्षिका आणि सेविका यांना मानधनाचा निधी सोलापूर महानगरपालिका स्वत:च्या निधीतून अदा करते. त्यामुळे त्यांच्या मानधनाबाबत अथवा इतर मागण्यांबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्याची बाब दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महागांव (जि.यवतमाळ) नगरपंचायत अस्तित्वात आल्यापासून कायमस्वरुपी मुख्याधिकारी नसल्याबाबत**

**(२७) ५३१५ (०५-०४-२०२०). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव (जि.यवतमाळ) नगरपंचायत अस्तित्वात आल्यापासून येथे कायमस्वरुपी मुख्याधिकारी नाही तसेच कार्यरत असलेले कर्मचारी जागेवर राहत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) व (२) • महागांव (जि.यवतमाळ) नगरपंचायत रीक्त मुख्याधिकारी पदाचा अतिरीक्त कार्यभार अन्य समकक्ष अधिका-यांकडे सोपविण्यात आला होता.

• त्यांचेमार्फत नगरपंचायतीचे प्रशासकीय कामकाज केले जात होते.

• तद्नंतर माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये सदर रीक्त पद भरण्यात आले असून, मुख्याधिकारी, महागांव नगरपंचायत या पदावर नियमित मुख्याधिकाऱ्याची नियुक्ती दि.१०.०२.२०२० च्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राळेगाव व बाभुळगाव नगरपंचायत क्षेत्रातील मुख्याधिकारी पद भरण्याबाबत

**(२८) ६०९४ (०६-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब नगरपंचायत (जि.यवतमाळ) येथील मुख्याधिकारी यांच्याकडे राळेगाव व बाभुळगाव येथील मुख्याधिकारी या रिक्त पदाचा प्रभार असल्याने एकाच अधिकाऱ्याकडे तीन नगरपंचायत असल्याने शहरातील नागरीकांची जन्म मृत्यूचे दाखले इ.कामे होण्यास विलंब होत असल्याचे नागरीकांनी दिलेल्या निवेदनावरून दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच अधिका-याकडे तीन नगरपंचायतीचा कार्यभार असल्याने पाणी टंचाई, नागरी स्वच्छता, ई. विकास कामे होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राळेगाव व बाभुळगाव नगरपंचायत क्षेत्रातील रिक्त असलेले मुख्याधिकारी यांचे पद भरण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१), (२) व (३) • राळेगाव व बाभुळगाव नगरपंचायतीच्या (जि.यवतमाळ) रीक्त मुख्याधिकारी पदाचा अतिरीक्त कार्यभार अन्य समकक्ष अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला होता.

• त्यांचेमार्फत नगरपरिषदेचे प्रशासकीय कामकाज केले जात होते.

• तद्नंतर माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये सदर रीक्त पदे भरण्यात आली असून, मुख्याधिकारी, राळेगाव व बाभुळगाव नगरपंचायत या पदावर नियमित मुख्याधिका-यांची नियुक्ती दि.१०.०२.२०२० च्या आदेशानुसार करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२९) ६१२४ (०२-०४-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात तलासरी, चारोटी, चिल्हार फाट्यापासून वसई घोडबंदर पर्यंतच्या रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्यामुळे या महामार्गावर अनेक अपघात होत असून अनेक लोकांचा मृत्यु होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने सदर ठिकाणी सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी शासनाने कायमस्वरुपी अशी कोणती उपाययोजना केली वा करण्यात या येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१५-१०-२०२०)** : (१) हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सुरत यांनी कळविले आहे.
सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीतील आहे.

त्यांचेमार्फत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ सुरत ते दहिसर कि.मी. २६३.००० ते कि.मी. ५०२.००० चे सहापदरी रुंदीकरण प्रकल्पांतर्गत मौजे अच्छाड ते घोडबंदर महामार्ग रस्त्याचे सहापदरीकरण माहे फेब्रुवारी २००९ मध्ये सुरु होऊन ते माहे एप्रिल २०१३ मध्ये पूर्ण झाले आहे. त्यादरम्यान सदर रस्त्याच्या अस्तित्वात असलेल्या चारही लेन विकासकांद्वारे देखभाल करुन महामार्गावरील वाहतुकीस योग्य अशा सुस्थितीत ठेवण्यात आल्या होत्या. तसेच सहापदरी रुंदीकरण एप्रिल २०१३ मध्ये पूर्ण झाल्यानंतर सदर महामार्ग विकासकांव्दारे नियमित देखभाल करुन महामार्गावरील वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे,असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कांदिवली (मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वसाधारण रुग्णालयात रुग्णांना विविध चाचण्यांसाठी खासगी लॅबकडे पाठविले जात असल्याबाबत

**(३०) ६२२७ (०६-०४-२०२०). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयात मागील काही वर्षापासून रुग्णांना रक्त तपासणीसह विविध चाचण्यांसाठी खासगी लॅबकडे पाठविले जात असून संबंधित खासगी लॅबचालकांकडून सर्वसामान्य रुग्णांची आर्थिक पिळवणूक सुरु असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारणास्तव सर्वसामान्य गोरगरीब रुग्णांची आर्थिक परवड होत असल्याने शासन याबाबत चौकशी करून आवश्यक कोणती कारवाई करणार वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०)** : (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविल्यानुसार, हे खरे नाही.

कांदीवली (पश्चिम) मुंबई येथील महापालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्वसाधारण रुग्णालयात प्रयोगशाळा विभाग तीन सत्रात (२४ X ७) कार्यरत असून त्यामार्फत रुग्णांच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या केल्या जातात. त्याचप्रमाणे रुग्णांसाठी इतर मुलभूत व प्रगत चाचण्या "आपली चिकीत्सा" या योजनेंतर्गत नाममात्र शुल्क आकारून केल्या जातात.

---

**राजगुरुनगर (जि.पुणे) नगरपरिषदेत करापोटी जमा झालेल्या रक्कमेचा अपहार झाल्याबाबत**

**(३१) ९८४३ (२८-०५-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (जि.पुणे) नगरपरिषदेत ७१ लाख ६९ हजार ५५७ रुपये करापोटी जमा केलेली रक्कम बँकेत जमा न करता कर्मचाऱ्यांनी परस्पर हडप करून अपहार केल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदेच्या सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाच्या विशेष लेखापरीक्षण अहवालामध्ये अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदेचे लेखापरीक्षक श्री.नरेंद्र कणसे यांनी सन २०१८-२०१९ च्या अर्धसमास अहवालाद्वारे सदर गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांकडून करापोटी जमा केलेल्या रक्कमेचा अपहार केलेल्या कर्मचाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) व (२) • राजगुरुनगर नगरपरिषदेच्या सन २०१८-२०१९ च्या वार्षिक लेखा परिक्षणामध्ये रुपये ७१ लाख ६९ हजार ५५७ इतकी विविध कराद्वारे जमा झालेली रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांनी नगरपरिषदेच्या बँक खात्यात जमा केली नसल्याचे फेब्रुवारी, २०२० मध्ये दिसून आले आहे.

(३) श्री.नरेंद्र कणसे, नगरपरिषदेचे अंतर्गत लेखा परिक्षक यांनी याप्रकरणी तपशिलवार चौकशी करुन संबंधीतांची जबाबदारी निश्चित केली आहे.

(४) व (५) • सन २०१८-२०१९ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालामध्ये आक्षेप / त्रुटी आढळून आल्यानंतर नगरपरिषदेने अंतर्गत लेखा परिक्षकामार्फत करण्यात आलेल्या तपशिलवार चौकशीमध्ये एकूण १२ कर्मचाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

• चौकशी करताना सन २०१८-२०१९ मधील रुपये ७१,६९,५५७/- तसेच दिनांक १/४/२०१९ ते दिनांक १०/५/२०१९ या कालावधीतील रुपये ५,६०,४१९/- इतकी रक्कम देखील संबंधीत कर्मचाऱ्यांनी बँक खात्यात जमा केली नसल्याचे दिसून आले आहे.

• नगरपरिषदेच्या एकूण १२ कर्मचाऱ्यांपैकी ६ कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेने निलंबित केले आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध दिनांक ३१/५/२०२० रोजी खेड पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

• उर्वरित ६ कर्मचाऱ्यांच्या निश्चित झालेल्या रक्कमा रुपये २० हजाराच्या आतील असल्याने त्यांचेविरुद्ध नगरपरिषदेने विभागीय चौकशी सुरु केली असून त्यांना दिनांक २/६/२०२० रोजी नोटीस देण्यात आल्या आहेत.

• नगरपरिषदेने सदर कर्मचाऱ्यांना रक्कम वसुली संदर्भात देखील नोटीस दिल्या होत्या. त्यानुसार एकूण रक्कमेपैकी रुपये ३७,९२,७१२/- इतकी रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांनी नगरपरिषदेकडे भरणा केली आहे.
• त्यानंतर संबंधीत कर्मचारी श्री.अमर मारणे यांनी नगरपरिषदेची पूर्व परवानगी न घेता नगरपरिषदेच्या खात्यात दिनांक १५/६/२०२० रोजी रुपये ३४,३२,६४५/- इतकी रक्कम जमा केली आहे. या जमा रक्कमेबाबत व इतर शिल्लक रक्कमेबाबत पोलीस पुढील तपास करीत असल्याचे नगरपरिषदेने कळिवले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांनी कोरोनासाठी ताब्यात घेतलेल्या खासगी रुग्णालयांच्या देयकावर महानगरपालिकांचे नियंत्रण नसल्याबाबत**

**(३२) ११३६८ (१०-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनावर मात करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने होरायझन, प्राईम, कौशल्या आणि वेदांत रूग्णालय तर कल्याण-डोंबिवली महापालिकेने होली क्रॉस, बाज आर.आर. रुग्णालय व निऑन ही रुग्णालये ताब्यात घेतली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी मार्गदर्शक सूचनांनुसार दर प्रणाली तयार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दरप्रणालीनुसार एका दिवसासाठी अकरा ते साडे अकरा हजार रुपये या हिशोबाने ८ दिवसांचे देयक एक लाख रुपयांच्या आसपास जात असल्याने सदर दर प्रणाली ही सर्वच स्तरावरील रुग्णांसाठी महागडी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भविष्यातील रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता या खासगी रुग्णालयांचे दर सामान्यांच्या आवाक्यात ठेवण्यासाठी महानगरपालिकेने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) ठाणे महानगरपालिकेने होरायझन, प्राईम, कौशल्या आणि वेदांत ही रुग्णालये ताब्यात घेतली नसून कोविड-१९ ग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी निर्देशीत केलेली आहेत.

तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने होली क्रॉस, बाज आर.आर. रूग्णालय व निऑन या रूग्णालयासोबत सामंजस्य करार करून सदर रूग्णालये कोविड-१९ रूग्णांच्या उपचाराकरिता उपलब्ध करून दिली आहेत.

(२) ठाणे महानगरपालिकेने राज्य शासनाच्या दिनांक २१.०५.२०२० च्या परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या दरानेच शुल्क आकरणीबाबत संबंधीत रुग्णालयांना निर्देशीत करण्यात आले असल्याचे कळविले आहे.

तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने तयार केलेले दर हे शासन मार्गदर्शक सुचनेतील नमुद दरापेक्षा कमी असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) • ठाणे महानगरपालिकेमार्फत दिनांक ३०.०४.२०२० रोजी घेतलेल्या बैठकीतील निर्णयानुसार दर आकारणी करण्यात येते.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत शासन निर्णय दिनांक २३.०५.२०२० नुसार जे रूग्ण “महात्मा फुले जन आरोग्य” योजनेनुसार पात्र ठरतात अशा रूग्णांकडून कोणताही दर आकारणी करण्यात येत नाही.

• सदर योजनेमध्ये जे रूग्ण पात्र ठरत नाहीत त्या रूग्णांकडून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक १५.०५.२०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार दर आकारणी करण्यात येते.

• सदरचे दर शासनाने दिनांक २१.०५.२०२० रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार नमुद दरापेक्षा कमी आहेत.

• ठाणे महानगरपालिकेने शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे खाजगी रुग्णालयांमार्फत वाजवी दर आकरले जातील याची खातरजमा करण्यासाठी मुख्य लेखा परिक्षक यांची नियुक्ती करुन खाजगी रुग्णालयातील देयकांचे लेखापरिक्षण केले जात असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच कल्याण-डोंबिवली मनपा हद्दीतील नोंदणीकृत सर्व खाजगी रूग्णालयाना त्यांच्या खाजगी रूग्णालयात एकूण बेड संख्येच्या ८० टक्के बेड हे शासनाने निर्धारीत केलेल्या कमाल दराची मर्यादा पाळून उर्वरीत २० टक्के बेडसाठी हॉस्पिटल त्यांचे दर आकारणी करू शकतात याबाबत लेखी आदेश देण्यात आले आहेत.

• तसेच भविष्यातील रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता या खाजगी रुग्णालयांचे दर सामान्यांच्या आवाक्यात ठेवण्यासाठी उपरोक्त कोविड रुग्णालयांची महात्मा ज्योतिबा फुले योजनेअंतर्गत नोंदणी करण्यात आली असून पात्र लाभार्थ्यांना मोफत उपचार देण्यात येत असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ११५४१ (१६-०७-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी झोपडपट्टीच्या विकासाकरिता देशी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल २५ पेक्षा जास्त वेळा निविदा निघूनही धारावीचा पुनर्विकास मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळेच करोनासारख्या विषाणूचा फैलाव मोठ्या प्रमाणात धारावी सारख्या दाटीवाटीत असलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धारावी सारख्या झोपडपट्टी भागात सार्वजनिक शौचालयांचा वापर अधिक प्रमाणात होत असल्यामुळेच कोरोनाचा फैलाव झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या धारावीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (२०-१०-२०२०) :** (१) नाही, हे खरे नाही.

धारावी झोपडपट्टीच्या विकासाकरिता राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ३ वेळा निविदा मागविण्यात आल्या, तिस-या निविदा प्रक्रिये अंतर्गत दोन निविदादार पात्र ठरले आहेत. निविदा प्रक्रिया अंतिम करण्याची कार्यवाही चालु आहे.
(२) व (३) दाटीवाटीच्या वस्त्यांमुळे आणि एका घरात सरासरी ६-१० लोक एकत्र राहत असल्याने सोशल डिस्टंसिंग पाळणे शक्य होत नाही. तसेच या कारणास्तव लक्षणे असलेल्या व्यक्तींकडून रोगाचा प्रसार इतर व्यक्तींना वेगाने होऊ शकतो, असे अभिप्राय बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिले आहेत.
(४) धारावी झोपडपट्टीच्या विकासाकरीता प्राप्त निविदेसंदर्भात मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र शासन यांचे अभिप्राय प्राप्त झाले असून, त्यानुसार प्राप्त निविदांवर सचिव समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका हद्दीतील इंद्रायणी नदीतील पाणी प्रदूषित झाल्याबाबत

**(३४) ११५७० (०६-०८-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील कंपनीचे रासायनिक व मैलामिश्रित पाणी थेट इंद्रायणी नदीत मिसळत असून परिणामी इंद्रायणी नदीचे पाणी प्रदूषित झाले असून या रासायनिक पाण्याचा परिणाम आळंदी नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पावर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रसायनयुक्त पाणी पिण्याची वेळ आळंदी मधील नागरिकांवर आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाण्यात पुन्हा जलपर्णीची प्रचंड प्रमाणात वाढ झाली असून परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण झाल्यामुळे आळंदी शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम होऊन आजाराचे प्रमाण वाढल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आळंदी मधील नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.
• पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील तसेच इंद्रायणी नदीच्या काठावर असलेल्या गावातील घरगुती पाणी, औद्योगिक सांडपाणी, मैलामिश्रित पाणी इंद्रायणी नदीमध्ये सोडले जाते. त्यामुळे आळंदी नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पावर ताण पडतो.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) • आळंदी नगरपरिषदेकरीता इंद्रायणी नदीमधील सिद्धबेट बंधाऱ्यातून पाणी उपसा करुन ते नगरपरिषदेच्या जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध केले जाते.
• नगरपरिषदेकडून जलशुद्धीकरण केंद्रामार्फत नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा केला जातो. यासाठी सदर पाण्याचे विविध ठिकाणचे दरमहा २० नमुने राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचेकडून तपासून घेण्यात येतात. अद्यापपर्यंतच्या त्यांच्या अहवालानुसार "पाणी पिण्यास योग्य" असे अहवाल प्राप्त झाले आहेत.
• नगरपरिषद हद्दीमध्ये पाण्यापासून झालेल्या साथीच्या आजाराबाबत नगरपरिषदेकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही, असे नगरपरिषदेने कळविले आहे.
• इंद्रायणी नदीच्या काही भागात जलपर्णी वाढलेल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. याकरीता नगरपरिषद आळंदी यांनी निविदा प्रक्रियेद्वारे ड्रम व बॅरलच्या सहाय्याने बंधाऱ्यातील जलपर्णी थोपवून शहरास पाणी पुरवठा सुरळीत केला जातो.
• आळंदी शहरास योग्य पाणी पुरवठा होण्यासाठी शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये रुपये ५.५१३ कोटी रक्कमेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली असून नगरपरिषदेने दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी कंत्राटदारास कामाचे आदेश दिलेले आहेत.
• पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत इंद्रायणी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी आणि नदीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी रुपये १५८७.०२ कोटी प्रकल्प किंमत असलेला इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाने पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयास दिनांक २० मार्च, २०२० रोजी सादर केला आहे.
• पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिक क्षेत्रातील लघु उद्योगामधून तयार होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी एकत्रित Common Effluent Treatment Plant (CETP) उभारण्यासाठी DPR महानगरपालिकेकडून तयार करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांना संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के भूखंड वितरीत करण्याबाबत

**(३५) ११६१४ (१८-०९-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई प्रकल्पग्रस्त महिला मंडळांना १२.५ टक्के योजनेंतर्गत राखीव असलेल्या भूखंडाचे वाटप नाममात्र दराने करण्याचे सिडकोचे धोरण असूनही अद्याप भूखंडाचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवा गावातील अहिल्या महिला मंडळ व नावसायी महिला मंडळ तसेच ऐरोली गावातील गावदेवी महिला मंडळ या प्रकल्पग्रस्त महिला मंडळांनी त्यांना १२.५ टक्के योजनेंतर्गत नाममात्रदराने राखीव भूखंडाचे वाटप करावे म्हणून सिडको प्राधिकरणाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के भूखंड वितरीत करण्याचा निर्णय घेऊनही प्रत्यक्षात प्रकल्पग्रस्तांना ७.८५ टक्के भूखंड सिडकोने वितरीत केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त महिला मंडळांना राखीव भूखंडाचे वाटप करण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्तांना उर्वरित शिल्लक भूखंड वितरीत करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

सिडको महामंडळाकडून महिला मंडळांना समाज कल्याणकारी उपक्रमाकरिता वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन पात्र संस्थांना / मंडळांना भुखंडाचे वाटप करण्यात येते.

अहिल्या महिला मंडळ व नावसायी महिला मंडळ तसेच गावदेवी महिला मंडळ यांनी महिला मंडळ या उपक्रमाकरिता भुखंड वाटपासाठी सिडकोकडे अर्ज सादर केल्याचे दिसून येत नाही.

(३) व (४) शासन निर्णय, दि.०६.०३.१९९० मधील तरतूदीनुसार १२.५ टक्के योजनेंतर्गत प्रकल्पग्रस्तांना भुखंडाचे वाटप करण्यात आलेल्या जमिनीपैकी किमान ३० टक्के जमीन सुविधा आणि सुखसोयीसाठी राखून ठेवल्याने ८.७५ टक्के भुखंडाचे वाटप करण्यात येते.

ठाणे तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतक-यांना १२.५ टक्के योजनेंतर्गत एकूण ९४ टक्के भुधारकांना भुखंड वाटप करण्यात आलेले आहेत. उर्वरित ६ टक्के प्रकल्पग्रस्तांना ठाणे तालुक्यातील सर्व गावांचे लिंकेज एक करुन भुखंड वाटपाची प्रक्रिया सुरु आहे. त्यानुसार दि.१०.०१.२०२० रोजीच्या संगणकीय सोडतीद्वारे पात्र प्रकल्पग्रस्तांना भुखंड इरादित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे येथील गोंदूर विमानतळाच्या धावपट्टीची लांबी वाढविण्याबाबत

**(३६) ११६९२ (१९-०९-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील गोंदूर विमानतळाच्या धावपट्टीची लांबी १४०० मीटर असून सदर धावपट्टीची लांबी वाढवून १७०० मीटर करण्यात यावी तसेच गोंदूर विमानतळावर व्यावसायिक विमान सेवा सुरु करून नाईट लॅन्डीगची पण व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी धुळे येथिल नागरिकांनी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णय घेतला आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१५-१०-२०२०) :** (१) जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे यांना दि.२०/०३/२०२० रोजी याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर निवेदनाची प्रत शासनास प्राप्त झाली असून निवेदनातील मुद्यांसंदर्भात MADCकडुन अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्हयातील चिखलदरा आलाडोह साठवण तलावाची उभारणी करण्याबबात

**(३७) ११९५३ (२०-०९-२०२०). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चिखलदरा आलाडोह साठवण तलाव (ब्रह्मसती प्रकल्प) पूर्ण करून आदिवासी बहुल परिसरराला पिण्याचे पाणी मिळण्यासाठी सिडकोकडून एकूण ३९ कोटी रुपये निधी मंजूर करणेबाबत व्यवस्थापकिय संचालक, सिडको मुंबई यांच्यासोबत मायक्रोसॉफ्ट लिंकद्वारे दिनांक २२ जुन, २०२० रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी बैठक घेऊन वरील मागणी केली व सिडकोने वरील मागणी तत्वतः मान्य केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखलदरा येथील विकास कामे मंजूर करून करुन सदर कामांसाठी निधी मंजूर करण्याबाबतचीही मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आदिवासी बहुल परिसरराला पिण्याचे पाणी मिळण्याबाबत तसेच चिखलदरा येथील विकास कामांना निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :**

(१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सिडकोची चिखलदरा अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. चिखलदरा शहराला पाणीपुरवठा करण्याकरिता बरमासत्ती नदीवर आलाडोह साठवण तलावाची उभारणी करण्याकरिता कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, अकोला यांचेकडून सिडको महामंडळाकडे प्रस्ताव प्राप्त झाला आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या समवेत झालेल्या संयुक्त स्थळपाहणीअंती, आलाडोह साठवण तलावाचा पाटबंधारे विभागाने मानचित्र अभ्यास करुन जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्रस्ताव सादर केला आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.२९.०१.२०१९ रोजी उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासक, चिखलदरा यांना आवश्यक निधी सिडकोने उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे. तद्नंतर, दि.१३.०२.२०२० रोजी सिडकोच्या विनंतीनुसार कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, अकोला यांनी  सुमारे ३८.४५ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देणेबाबत सिडकोस प्रस्ताव सादर केला आहे.

दरम्यानच्या कालावधीत लोकप्रतिनिधीसोबत मायक्रोसॉफ़्ट लिंकद्वारे दि.२२.०६.२०२० रोजी झालेल्या बैठकीत अधिक्षक अभियंता (पाटबंधारे) विभाग, अकोला यांनी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळामार्फत सिडकोस प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तथापि, सदर बैठकीमध्ये चिखलदरा येथील विकास कामे मंजुर करणे व त्यासाठी देय निधी मंजूर करण्याच्या मागणीबाबत चर्चा झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिरोंचा नगरपंचायत येथे विविध विकास कामांकरीता ई-निवीदा प्रकिया नियमबाह्यपणे केल्याबाबत

**(३८) ११९८४ (१७-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरोंचा (जि.गडचिरोली) नगरपंचायत येथे विविध विकास कामांकरीता दिनांक २३ एप्रिल, २०२० ते ०३ मे, २०२० या दरम्यान ई-निवीदा प्रकिया पुर्ण करतांना शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. २७/९/२०१८ च्या निर्देशाचे पालन न झाल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा उघडतांना बहुसंख्य कंत्राटदार उपस्थित असणे अनिवार्य असतांना अत्यल्प कंत्राटदारांच्या उपस्थितीत निविदा उघडण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निविदा प्राधिकाऱ्याने ठराविक कंत्राटदारांशी संगनमत करुन त्यांना काम मिळण्याच्या हेतूने निविदा प्रक्रिया पार पाडल्याचे प्रथमदर्शी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या निर्देशाचे पालन न करता नियमबाह्य निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आल्यामुळे निविदा प्रकिया रद्द करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमबाह्य लिलाव प्रक्रिया पार पाडणाऱ्या निविदा प्राधिकाऱ्यावर शासनाच्यावतीने निलंबनाची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१), (२), (३), (४) व (५) • सिरोंचा नगरपंचायत अंतर्गत १५ विकास कामांकरीता ऑनलाईन ई-निविदा दिनांक २३/४/२०२० रोजी वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये सदर निविदा दिनांक ४/५/२०२० रोजी सकाळी १२-०० वाजता संकेतस्थळावर पहावयास मिळतील असे नमूद करण्यात आले होते. त्यानुसार संबंधीत निविदाकारांनी त्यावेळी उपस्थित राहणे ही त्यांची जबाबदारी आहे.
• ऑनलाईन निविदा प्रक्रिया असल्याने निविदा भरलेल्या कंत्राटदारांची नावे निविदा उघडल्यानंतर कळू शकतात. त्यामुळे सदरच्या निविदाकारांना निविदा उघडण्याच्या दिवशी वेगळ्याने बोलावण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
• निविदा उघडण्याच्या दिवशी म्हणजे दिनांक ४/५/२०२० रोजी दुपारी १२-०० वाजेपर्यंत निविदाकारांनी येणे अपेक्षित होते. परंतु दुपारी १-०० वाजेपर्यंत प्रतिक्षा केली असता एकही निविदाकार उपस्थित नसल्याने नियमानुसार उपस्थित पदाधिकारी, कर्मचारी यांचे उपस्थितीत निविदा उघडण्यात आल्या आहेत.
• सदर निविदा L१ दरानुसार मान्यतेकरीता दिनांक २७/५/२०२० रोजीच्या स्थायी समितीसमोर सादर केले असता सर्वानुमते त्यास मंजूरी देण्याचा ठराव पारित केला आहे.
• निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पूर्ण करुन L१ धारकास मंजूरी दिली असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता दिसून आली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोपाननगर (पुणे) येथील पाणीपुरवठा वाहिन्या जीर्ण झाल्याबाबत**

**(३९) १२००२ (२०-०९-२०२०). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोपाननगर (पुणे) येथील अनेक वर्षापूर्वी टाकलेल्या पाणीपुरवठ्याच्या वाहिन्या जीर्ण झाल्याने या वाहिन्यांमध्ये मैलापाणी मिसळत असल्याने या परिसरातील नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे नवीन पाण्याची वाहिनी दिनांक २५ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास फुटली असून एलएनटी आणि पुणे पाणीपुरवठा विभाग यापैकी कोणीही वाहिनीची दुरुस्ती केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या भागातील जीर्ण वाहिन्या बदलण्याबाबत व कामांमध्ये विलंब करणाऱ्या संबधित दोषींवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१), (२) व (३) • पुणे महानगरपालिकेमार्फत २४ X ७ प्रकल्पांतर्गत पुणे शहरातील सर्व ठिकाणच्या ज्युन्या व जीर्ण झालेल्या पाण्याच्या पाईपलाईन बदलने, नविन जलवाहिनी टाकणे हे काम मे.एल.ॲन्ड टी. कंपनी मार्फत चालू आहे.
• सोपाननगर (पुणे) येथील जलवाहीन्या जीर्ण झाल्याने या वाहीन्यांमध्ये मैलापाणी मिसळत असून परिसरातील नागरीकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याची बाब निदर्शनास आली.
• तद्नंतर सर्व लाईन साफ करण्यात आलेल्या असून जीर्ण झालेल्या लाईन्स तातडीने बदलण्यात आलेल्या आहेत, असे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) "ब" वर्ग नगरपरिषद हद्दीमध्ये कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत**

**(४०) १२२८७ (१८-०९-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) "ब"वर्ग नगरपरिषद हद्दीमध्ये कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत नगरपरिषदेला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागत असल्याची बाब दिनांक २३ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीच्या व्याजाची रक्कम शहरातील वाढत्या कोरोना संसर्ग रोखण्यासाठी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, नवि-४ यांना दिनांक २६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार "ब"वर्ग नगरपरिषद मलकापूर (जि.बुलढाणा) यांना १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीच्या व्याजाची रक्कम कोविड-१९ अंतर्गत खर्च करण्याची परवानगी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-१०-२०२०) :** (१) होय.
(२) होय.

अध्यक्ष, नगरपरिषद मलकापूर, जि.बुलडाणा यांचे १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीवर व्याजाची रक्कम कोरोना संसर्गाच्या उपाययोजनांवर खर्च करण्यास परवानगी मिळण्याबाबत दिनांक २४.०६.२०२० रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(३) कोरोना आजाराशी संबंधीत उपाययोजनांचा खर्च वित्त आयोगाच्या अनुदानावरील व्याजाच्या रक्कमेतून करण्यास दिनांक १४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री साईबाबा संस्थान शिर्डी (जि.अहमदनगर) येथील कर्मचाऱ्यांच्या वेतनातील तफावत दुर करण्याबाबत**

**(४१) १२३३४ (१९-०९-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री. साईबाबा संस्थान शिर्डी (जि.अहमदनगर) येथील कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा पदावरील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन लागू करण्याबाबतचा प्रस्ताव श्री. साईबाबा संस्थान शिर्डी यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे प्रस्ताव सादर केला असता, शासनाच्या सूचनेनुसार प्रस्तावातील त्रुटीची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारस शासनास पुन्हा सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ मार्च, २०२० रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदन देऊन सदर प्रस्तावास मान्यता देण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१९-१०-२०२०) :** (१) श्री साईबाबा संस्थान असंघटित कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी त्यांच्या दि.१६.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये समान काम समान वेतन यासाठी कंत्राटी कर्मचारी आमरण उपोषण सुरु करणार असल्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे दि.२५.०८.२०१६ रोजी याविषयी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अनुषंगाने कामगारांना समान काम समान वेतन लागू करण्याबाबत दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी शासनाकडे केवळ अभिप्रायासाठी पत्रव्यवहार केलेला आहे. शासनाकडून कोणतेही त्रुटींची पूर्तता करण्याबाबतचे पत्र श्री साईबाबा संस्थान शिर्डी (जि.अहमदनगर) यांना पाठविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

(२) दि.११.१०.२०१७ अगर त्यासुमारास प्रस्ताव प्राप्त नाही. मात्र, लोकप्रतिनिधी यांचे दि.०५.०३.२०२० रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) व (४) प्रस्ताव नसला तरी मा.लोकप्रतिनिधी यांचे दि.०५.०३.२०२० च्या निवेदनाच्या अनुषंगाने शिर्डी संस्थानास आवश्यक त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात आले आहे.

---

## सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे (ता.शहापूर, जि.ठाणे) यांचेमार्फत करण्यात येत असलेल्या कामांमध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(४२) १२३५७ (१९-०९-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे (ता.शहापूर, जि.ठाणे) यांचेमार्फत सन २०१९-२० या कालावधीत पुरवणी विकास निधीमधून रस्त्यांच्या दुरूस्ती तसेच नविन रस्त्यांच्या बांधकामाची कामे मंजूर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणती व किती कामे मंजूर करण्यात आली असून या सर्व कामांबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती काय व उपरोक्त कामांचे स्वरूप व सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदरहू कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व कामांची सखोल चौकशी करून या प्रकरणी दोषी आढळणा-या अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१५-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.
तथापि, सन २०१९-२०२० मधील अर्थसंकल्पामध्ये शहापूर तालुक्यातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्गाची रुपये १४३३.८४ लक्ष किमंतीसाठी ९ कामे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच विशेष दुरुस्ती अंतर्गत राज्यमार्गाच्या दुरुस्तीची रु.३७५ लक्ष किमंतीची २ कामे मंजूर करण्यात आलेली आहेत.
(२) शहापूर तालुक्यातील ११ कामांपैकी ५ कामांना कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले आहेत. कार्यारंभ आदेश दिलेल्या ५ कामांपैकी दोन कामे बहुतांशी पूर्ण झालेली असून उर्वरित ३ कामे अद्याप हाती घेण्यात आलेली नाहीत.
कार्यारंभ आदेश दिलेल्या उपरोक्त ५ कामांसाठी शासकीय नियमानुसार ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.
(३) सदरहू कामांमध्ये बोगस तसेच निकृष्ठ दर्जाची कामे करण्यात आली आहेत अशा आशयाच्या तक्रारी अप्राप्त आहेत.

(४) कार्यान्वित केलेल्या २ कामांपैकी एका कामाची दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या पथकाने पाहणी केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली, भिवंडी, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार या महानगरांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत**

**(४३) १२७०२ (२०-०९-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली, भिवंडी, मीरा-भाईंदर आणि वसई-विरार या महानगरांतही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, भिवंडी आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकामधील झोपडपट्टी पुनर्विकासासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (२०-१०-२०२०) :** (१), (२) व (३) दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार नवी मुंबई महानगरपालिका (सिडको व नैना यांच्या क्षेत्रांसह) आणि ठाणे, पनवेल, कल्याण-डोंबिवली, भिंवडी-निजामपूर, वसई-विरार, मिरा-भाईंदर व उल्हासनगर या महानगरपालिका आणि तसेच अंबरनाथ, बदलापूर, अलिबाग, पेण, खोपोली, माथेरान व कर्जत या नगरपरिषदा यांचा समावेश असणा-या क्षेत्रांसाठी ठाणे मुख्यालय असणारे मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून) नियुक्त करण्याबाबत दिनांक ०८.०९.२०२० रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

---

**रामटेकडी (पुणे) येथील एसआरए इमारतीची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) १२८७३ (२०-०९-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेकडी (जि.पुणे) येथे मागील काही वर्षापासून एसआरए अंतर्गत काम सुरु असून तेथील ए, बी आणि डी इमारतींचे कामे पूर्ण झाली असून सी व ई या इमारतीचे काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जितेंद्र आव्हाड (२०-१०-२०२०) :** (१),(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत विकासक यांनी "योजना पुर्णत्वा" च्या अनुषंगाने दिनांक ०९/०८/२०१९ रोजी सादर केलेल्या " Phase Programme" मध्ये सी इमारतीचे काम मार्च एप्रिल २०२० पर्यंत पुर्ण होईल व इमारत ई चे मार्च २०२१ पर्यंत आर.सी.सी व विट बांधकाम पुर्ण होईल, असे कळविले होते. सी इमारतीचे काम जवळजवळ अंतिम टप्यात असून ई इमारतीचे काम जोत्यापर्यंतच पुर्ण आहे. सदर योजना पुर्ण करणेबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कडून विकासकाकडे सतत पाठपुरावा सुरू आहे.

---

## गुहागर नगरपंचायतीतील (जि.रत्नागिरी) १४ व्या वित्त आयोग योजनेतील कामे ही नगरपंचायतीच्या मालकीच्या जमिनीमध्ये नसल्याबाबत

**(४५) १३३०९ (१६-०७-२०२०). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर नगरपंचायतीने (जि.रत्नागिरी) १४ वा वित्त आयोग योजनेंतर्गतच्या कामांची निविदा दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रसिध्द करून मंजूर केलेली कामे ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जमिनीमध्ये असावीत असा नियम असताना ४१ पैकी ३२ कामे ही नगरपंचायतीच्या मालकीच्या जागेत नसल्याची बाब मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर यांनीच दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अर्जदार श्री.जयदेव मुरलीधर मोरे (रा.गुहागर) यांना माहितीच्या अधिकाराखालील माहितीमध्ये दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना चौकशीचे आदेश देऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सत्वर सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यात काय नमूद करण्यात आले आहे, तसेच खोटे प्रमाणपत्र सादर करून कामे मंजूर करून शासनाची दिशाभूल आणि फसवणूक केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले असल्यास या गंभीर प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपंचायत गुहागर तसेच सदर कामांना मंजुरी देणाऱ्या प्रक्रियेतील संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०९-२०२०) :** (१) गुहागर नगरपंचायत हद्दीत १४ व्या वित्त आयोग योजनेंतर्गत करावयाच्या "रस्ते, पाखाडी, गटार आणि संरक्षण भिंत" अशा दि. ०२/११/२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ४१ कामांपैकी २४ कामांच्या जागा ह्या नगरपंचायत मालकीच्या असल्याची कागदपत्रे उपलब्ध नसल्याची बाब माहिती अधिकारांतर्गत अर्जदारास कळविल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी सुरु असल्याची बाब जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(४६) १३५२७ (२०-०९-२०२०). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळ प्रकल्पबाधित गावका-यांनी सिडको कार्यालयावर ३९ दिवस आमरण उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्तांची मा.नगरविकास मंत्री यांच्या समवेत बैठक दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले व प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या सोडविण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१०-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अखिल भारतीय किसान सभा, रायगड यांनी दि.२३.१२.२०१९ रोजी मुक्कामी मोर्चाचे आयोजन केले होते. मात्र, दि.१६.०१.२०२० पासून बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली होती. आंदोलनकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर दि.२४.०१.२०२० रोजी आमरण उपोषण मागे घेण्यात आले.

(२) व (३) होय हे खरे आहे.

सदर बैठकीमध्ये प्रकल्पग्रस्तांना जाहीर करण्यात आलेल्या पुनर्वसन पॅकेजवर चर्चा करण्यात आली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाबाबत शासन निर्णय, दि.०१.०३.२०१४ व दि.२८.०५.२०१४ अन्वये मंजूर केलेल्या पुनर्वसन पॅकेज नुसार देय लाभ अदा करण्यात आले असून सुमारे ९६ टक्के प्रकल्पबाधित स्थलांतरित करण्यात आलेले आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या सिडकोस प्राप्त झालेल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या सादर केलेल्या काही मागण्या ह्या उक्त पुनर्वसन पॅकेजबाहेरील असून त्यापैकी मच्छिमार बांधवांसाठी जेट्टी उभारणी तसेच मच्छीमार्केटसाठी भूखंड इ. मागण्या सकारात्मक दृष्टीकोनातून मान्य करुन त्याप्रमाणे सिडकोकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खानापूर (जि.सांगली) नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये पुरातन विभागाच्या नियमावलीमुळे बांधकामास प्रतिबंध असल्याबाबत

**(४७) १३६१९ (२०-०९-२०२०). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये पुरातन विभागाच्या नियमावलीमुळे बांधकाम करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात बांधकाम करण्यास प्रतिबंध करण्यात आल्यामुळे नगरपंचायत हद्दीतील जुन्या व मोडकळीस आलेल्या घरांचे बांधकाम करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याबाबत तोडगा काढण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१), (२) व (३) • खानापूर नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये ६१२० चौ.मी. क्षेत्रावर मोहम्मद तुघलक दरगाह आहे.

• सदर जागेची मालकी केंद्र सरकारची आहे. सदर क्षेत्र भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मुंबई मंडळ अंतर्गत राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे.

• सदर स्मारकास प्राचीन स्मारके व पुराणवस्तु शास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८ लागू आहे. त्यामुळे स्मारकाच्या पासूनच्या ३०० मीटर परिसरात कोणतेही बांधकाम करावयाचे झाल्यास उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाची पूर्व परवानगी / ना-हरकत घ्यावी लागते.

• दरगाह परिसराच्या ३०० मीटर पेक्षा जास्त अंतरावर असणाऱ्या तसेच खानापूर नगरपंचायत अंतर्गत असणाऱ्या बांधकामास नियमानुसार नगरपंचायतीकडून परवानगी देण्यात येते, त्यात कोणतीही अडचण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उरुळी-फुरसुंगी (जि.पुणे) येथील कचरा डेपो बंद करण्याबाबत

**(४८) १४११६ (२०-०९-२०२०). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरुळी-फुरसुंगी (जि.पुणे) येथील कचरा डेपोत मोठ्या प्रमाणावर कचरा टाकल्यामुळे निर्माण होणा-या समस्यां विरोधात अनेक वर्षापासून स्थानिक नागरिक आंदोलने करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळले आहे व तद्नुसार सदर कचरा डेपो अन्यत्र हलविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) उरळी-फुरसुंगी कचरा डेपोमध्ये कचरा टाकल्यामुळे सदर डेपो बंद करावा यासाठी स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी आंदोलन केले आहे, हे खरे आहे.

(२) • देवाची उरळी/फुरसुंगी येथे सु.१६३ एकर जागेवर पुणे महानगरपालिकेचा एकमेव कचरा डेपो सन १९९१ पासून कार्यरत असून घनकचऱ्यावर प्रक्रीया केल्यानंतर निर्माण होणाऱ्या अंदाजे ३५० ते ४०० मे. टन रिजेक्ट/इनर्ट कचरा सदर डेपोच्या ठिकाणी असलेल्या भू-भरावामध्ये घेण्यात येतो.

• जानेवारी, २०१५ पासून भू-भरावाच्या सुमारे २० एकर जागेवर कचरा टाकण्यात येत होता. सदर जुन्या कचऱ्याचे अंदाजित प्रमाण हे ९ ते १० लाख मे.टन इतके आहे.

• सदरच्या कचऱ्यापासून तेथील नागरिकांना होणाऱ्या त्रासामुळे दि.१८.०४.२०१९ पासून बायोमायनिंग प्रक्रीयेव्दारे सदर ठिकाणच्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रीया करण्याचे काम सुरू केले आहे.

• त्यामुळे सुमारे ११ एकर जागा मोकळी करून घेण्यात आलेली आहे.

• तसेच भू-भरावात प्रक्रीया न करता घेण्यात येणारा कचरा पूर्णपणे थांबविलेला असून सदर ठिकाणी फक्त कचऱ्यावर प्रक्रीया केल्यानंतर निर्माण होणारे उर्वरित रिजेक्ट/इनर्ट भू-भरावामध्ये घेण्यात येत आहे.

• तसेच शास्त्रोक्त भू-भराव उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहेत.

• या व्यतिरिक्त स्थानिक नागरिकांना त्रास होवू नये म्हणून जुन्या कचऱ्यावर कॅपिंग प्रक्रीया, वृक्ष लागवड, उर्वरित कचऱ्यावर नियमितपणे मातीचे आवरण टाकून कचरा झाकणे, बायोकल्चर व औषध फवारणी करणे, दुषित वायू संकलित करून जाळण्याची प्रक्रीया करणे, वायू प्रदूषण होवू नये याची दक्षता घेणे इ. उपाय योजना करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच उरळी-फुरसुंगी येथील कचरा डेपोसाठी पिंपरी सांडस, ता.हवेली, जि.पुणे येथील सुमारे १९.९ हे. जागा वन विभागाकडून प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळवीले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जमातीच्या सेवामुक्त केलेल्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४९) १४१५४ (१९-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, निमशासकीय व महामंडळामधील जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकल्याने बडतर्फ झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना, अधिसंख्य पदावर ११ महिन्याकरिता पुन्हा शासकीय सेवेत घेण्याचे आदेश दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४.२ नुसार देण्यात आले असूनही अद्याप सदर कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर ३० ते ३५ वर्ष नोकरी करून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना गत ५ महिन्यांपासून निवृत्तीवेतन व इतर लाभ देण्यात आलेले नसून कमी करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नोकरीत पुन्हा सामावून न घेणे तसेच कर्मचाऱ्यांना वेतन वाढ न देणे इत्यादी तक्रारीबाबत ऑफ्रोह संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे, त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिनांक १५ जून १९९५ रोजी पूर्वी झाली होती व त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना SBC, NT, OBC तसेच खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात आले होते याबाबतची खातेनिहाय माहिती काय आहे,

(४) तसेच दिनांक ३० जून, २००४ रोजीच्या शासन निर्णयानूसार दिनांक २८ नोव्हेंबर, २००० रोजीपर्यंत ज्या कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण देवून SBC/NT/OBC तसेच खुल्या प्रवर्गात समावून घेतले आहे अशा कर्मचाऱ्यांचा समावेश अधिसंख्येत होत नसून केवळ सन २००० ते आजतागायत शासकीय सेवेत समावेश झालेले व ज्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे असे कर्मचारी अधिसंख्य पदावर वर्ग करण्यास पात्र आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दिनांक २८ नोव्हेंबर, २००० रोजीपर्यंत किती कर्मचाऱ्यास सेवासंरक्षण देवून त्यांचा प्रवर्ग बदलण्यात आला आहे तसेच अधिसंख्य कर्मचारी ही संकल्पना कायदेशीर तरतुदीनुसार आहे काय, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात अधिसंख्य पुर्वलक्षी रोखण्याची प्रभावाने वर्ग करण्याचे नमुद करण्यात आले आहे काय, त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांची वेतन वाढ रोखण्याची कार्यवाही कोणत्या सेवा शर्ती अधिनियमान्वये करण्यात आली आहे याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१६-१०-२०२०) :** (१) व (२) हे खरे आहे.

दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या ज्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी सेवामुक्त केले होते, त्या कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांच्या कालावधीकरीता अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित कार्यालयाकडून अशा कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे. काही कार्यालयाकडून प्रशासकीय अडचणीमुळे अशा नियुक्त्या होऊ शकल्या नाहीत. काही कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिलेली नसल्याची निवेदने प्राप्त झालेली असून संबंधित कर्मचाऱ्यास कार्यालयात रुजू करुन घेण्याबाबतच्या सूचना दि.३०.६.२०२० च्या अ.शा.पत्रान्वये सर्व विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

अधिसंख्य पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पुढील आदेशापर्यंत वेतनवाढ न देण्याबाबतच्या सूचना दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

सदर कर्मचाऱ्यांना सेवाविषयक/ सेवा निवृत्ती लाभ देण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.६.२०२० च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) कोविड १९ या आजारामुळे राज्यात जाहिर केलेल्या लॉकडाऊनमुळे कार्यालयातील उपस्थिती मर्यादित करण्यात आलेली आहे. त्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करता आली नाही.

(४) हे खरे नाही.

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत रुजू झालेल्या व सदर जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचांदुर (जि.चंद्रपूर) नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्र.३ येथे प्रतिबंधीत क्षेत्रात नागरिक नियमांचे उल्लंघन करीत असल्याबाबत

**(५०) १४३४३ (२०-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदुर (जि.चंद्रपूर) नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्र.३ येथे दुसरा पॉझिटीव्ह कोरोना रूग्ण आढळून आला असूनसुध्दा सदर प्रतिबंधीत क्षेत्रात नागरिक नियमांचे उल्लंघन करीत असल्याबाबत मा.वि.स.स. बल्लारपूर यांनी मुख्याधिकारी, गडचांदूर नगरपरिषद यांना दिनांक १३ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०२०) :** (१) व (२) • यासंदर्भात मा.विधानसभा सदस्य (बल्लारपूर) यांचे लेखी निवेदन नगरपरिषद कार्यालयास प्राप्त झाले नसल्याचे मुख्याधिकारी, नगरपरिषद गडचांदूर यांनी कळविले आहे.

• तथापि, गडचांदूर नगरपरिषदेतील प्रभाग क्रमांक ३, वॉर्ड क्रमांक ५ (डॉ. खेकडे हॉस्पीटल परिसर) या भागात कोरोना बाधित रुग्ण आढळून आल्याने व त्याचा प्रादुर्भाव इतर भागात पसरु नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तेथील परिघीय क्षेत्राचे सीमा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, राजूरा यांनी दिनांक ३/७/२०२० रोजीच्या आदेशान्वये बंद केल्या होत्या.

• तसेच सदर परिसरात २ नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, भारतीय साथरोग प्रतिबंध अधिनियम, १८९७ व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ चे उल्लंघन केले असल्याने त्यांना दिनांक १/७/२०२० रोजी नोटीस देऊन सदर कायद्याअंतर्गत त्यांना प्रत्येकी रुपये २०००/- दंड करण्यात आला आहे. तसेच संबंधीतांविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये FIR देखील नोंदविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.